पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सॅनिटायझेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात परीक्षा विभागातील अधिकारीच कोरोना बाधित सापडल्याने विद्यापीठ प्रशासन हादरले आहे. प्रशासनाने तातडीने परीक्षा विभागातील सर्व इमारतीचे निर्जंतुकीकरण केले आहे. तर विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्याने दक्षता घ्यावी, असे आवाहन केले आहे.

गुरुवारी दिवसभर प्रशासनाने या विभागातील प्रत्येक इमारतीतील प्रत्येक खोलीत सॅनिटायझेशन करून औषध फवारणी केली. विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रबोधन करून सॅनिटायझेशनसह हात स्वच्छ धुणे, मास्क नियमित वापरणे सूचना केल्या.

Edition
Jul 31, 2020 Page No. 1
epaper.enavabharat.com

ज्ञान देवाण-घेवाणीसाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणात तरतूद

# विद्यापीठांमध्ये स्वतंत्र भाषांतर विभाग

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** परदेशातील आणि देशांतील विविध भाषांतील पुस्तके, ज्ञान, माहिती सर्वदूर पोहोचवण्यासाठी 'भाषांतर आणि अन्वयार्थ' संस्था उभी करण्यात येणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात या स्वतंत्र संस्थेची तरतूद करण्यात आली असून विद्यापीठांमध्येही स्वतंत्र भाषांतर विभाग सुरू करण्यात येणार आहेत.

'इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशन अँड इंटरप्रिटेशन' या स्वतंत्र संस्थेसाठी नव्या शिक्षण धोरणात तरतूद करण्यात आली आहे. शालेय स्तरापासून उच्चशिक्षणातील




अभ्यास साहित्य विविध स्थानिक भाषांमध्ये या संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. परदेशी भाषांमधील साहित्यही स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचप्रमाणे भारतातील साहित्य परदेशांत पोहोचावे यासाठी त्याचेही परदेशी भाषांमध्ये भाषांतर करण्याचे काम या संस्थेमार्फत करण्यात येईल. 'साहित्याचे भाषांतर होण्याबरोबरच बहुभाषिकांना नोकरीचीही संधी या संस्थेच्या माध्यमातून मिळेल,' असे धोरणात नमूद करण्यात आले आहे.

विद्यापीठांमध्ये भाषांतरासाठी स्वतंत्र विभाग तयार करण्यात येतील. त्याचप्रमाणे भाषांतराचा अभ्यासक्रमही तयार करण्यात येईल.

**अभिजात भाषेसाठी...**

त्रिभाषा सूत्रानुसार सर्व संस्कृत भाषेचाही पर्याय शालेय स्तरापासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संस्कृत विषयाकरिता शिक्षक उपलब्ध होण्यासाठी शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातही संस्कृत शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात येईल. त्याशिवाय भारतातील तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम, उडिया, पाली, पर्शियन आणि प्राकृत भाषांचे पर्यायही शालेय स्तरापासून देण्यात येतील. विद्यापीठ स्तरावरही या भाषांचे स्वतंत्र विभाग सुरू करण्यात येतील. – **संबंधित / ४**

### वाचन प्रोत्साहनासाठी...

विद्यार्थ्यांना वाचनगोडी लावण्यासाठी राष्ट्रीय धोरण आखण्यात येणार आहे. 'नॅशनल बुक प्रमोशन पॉलिसी' तयार करून त्याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या हाती दर्जेदार पुस्तके देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांसाठी खास पुस्तकांची निर्मिती करण्यात येईल. पुस्तकांचे सर्व स्थानिक भाषांमध्ये भाषांतर करून ती शाळांमध्ये वितरित करण्यात येतील. आंतरराष्ट्रीय पुस्तकेही स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. शाळांमधील ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये ही पुस्तके पुरविण्यात येतील. शाळांमध्ये 'बुक क्लब' स्थापन करण्याची तरतूद शिक्षण धोरणात करण्यात आली आहे.